१३ बँकीग (Banking)

- देशाच्या वित्तीय संरचनेमधील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे वित्तीय संस्था किंवा बँका होत.
- Bank हा इंग्रजी शब्द Banc किंवा Banco या इटालियन शब्दापासुन तयार झाला आहे. Banco हा शब्द Banch या शब्दापासुन तयार झाला आहे. ज्याचा अर्थ बसायचा बाक असा होतो.
- इटली मध्ये पुर्वी ज्यू लोक लोंबार्डी नावाच्या रस्त्यावर बकावर पैसे ठेवून- पैसे देण्या घेण्याचे व्यवहार करत असत.
- जगातील बँकाची उत्क्रांती इ.स.पूर्व 2000 मध्ये ग्रिस मधील बॅबिलोन मध्ये झाली आहे. देवळातील पुजारी बँक व्यवहार पार पाडत असत.

बँकाची उत्क्रांती

- 1157 मध्ये युरोप मध्ये Bank of Venice ही पहिली राष्ट्रीय बँक स्थापन करण्यात आली.
- आधुनिक बँकिंगचे जनक - अलेक्झांडर हॅमिल्टन हे आहेत. (अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेची स्थापना)
- सिएना येथील टस्कन शहरात 1472 मध्ये Banca Monte DCT Paschi di siena - बॅन्का मॉंटे देई पासची दि सिएना ही बँक स्थापन करण्यात आली.
- 1668 मध्ये Sveriges Risk Bank of Sweden ही पहिली मध्यवर्ती बँक स्थापन करण्यात आली.
- **1584 मध्ये बँक ऑफ व्हेनीस ची** स्थापना झाली.
- 1694 मध्ये England Bank of England या इंग्लंडच्या मध्यवर्ती बँकेची स्थापना झाली. या बँकेच्या मॉडेलवर बहुतेक देशांच्या मध्यवर्ती बँका स्थापन झाल्या आहेत.

भारतात बँकांची उत्क्रांती -

- 1770 मध्ये अलेक्झांडर अँड कंपनी यांनी कोलकत्ता येथे बँक ऑफ हिंदुस्थान नावाची बँक स्थापन केली. 1832 पर्यंत ही बँक कार्यरत होती.
- 17 व्या शतकात इंग्रजांनी भारतात एजन्सीगृहाची स्थापना केली.
- 18 व्या शतकात एजन्सीगृहानी भारतातील इलाख्याच्या ठिकाणी इलाखा बॅंकांची स्थापना केली.

1806 - बँक ऑफ कोलकत्ता

↓ Marged

1809 - बँक ऑफ बंगाल
1840 - बँक ऑफ बॉम्बे
1843 - बँक ऑफ मद्रास
(प्रेसिडेन्सी बँक)

↓ Marged

1921 - इम्पेरिअल बँक (100 वर्षापूर्वी)

↓ Marged

1955 - स्टेट बँक ऑफ इंडिया

- 1860 - मध्ये मर्यादित जबाबदारीच्या तत्वावर अनेक बँका स्थापन झाल्या.
- 1881 - मध्ये औंध कमर्शिअल बँक ही पहिली भारतीय संयुक्त बँक स्थापन करण्यात आली.
- 1894 - मध्ये PNB 'पंजाब नॅशनल बँक' ही पहिली भारतीय लोकांची बँक स्थापन करण्यात आली.
- 1901 - मध्ये पीपल्स बँक स्थापन करण्यात आली.
- 19 व्या शतकात - बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, म्हैसुर बँक इत्यादी बँका स्थापन झाल्या.
- 1913 ते 1929 या काळात भारतात बऱ्याच व्यापारी बँका स्थापन करण्यात आल्या. त्यापैकी 108 बँका बंद पडल्या.

एस.बी.गुप्ता यांच्या मते, "वित्तव्यवस्था म्हणजे संस्थात्मक घटकांचा (व्यवस्थांचा) असा संच की ज्यांच्या माध्यमाने अर्थव्यवस्थेतील उपलब्ध वित्तीय आधिक्याचे संकलन केले जाते."

प्रो.प्रसन्न चंद्रा यांच्या मते , " वित्त प्रणालीमध्ये विविध वित्तीय संस्था, बाजारपेठा आणि वित्तीय साधने यांचा समावेश असून हे सर्व घटक एकमेकांशी पध्दतशीरपणे जोडलेले असतात. व ही व्यवस्था बचतीचे गुंतवणूकीत रुपांतर करणारी मुख्य साधणे उपलब्ध करुन देते."

वित्तीय संरचना

☛ बँकिंग हा घटक भारताच्या वित्तीय संरचनेशी संबधित आहे. वित्तीय संरचना म्हणजे, अर्थव्यवस्थेतील आर्थिक घटकांमध्ये होणारे वित्तीय (पैशाचे) व्यवहार होत.

भारतातील वित्तीय संरचना
(Financial Structure)



(A) वित्तीय बाजार (Financial Market)



(A) भांडवली बाजार

- 1. गिल्ट बाजार
  - शासकीय प्रतिभूती बाजार
- 2. औद्योगिक रोखे बाजार
  - नवरोखे बाजार → प्राथमिक बाजार → शेअर बाजार
  - विद्यमान रोखे बाजार → दुय्यम बाजार → शेअर बाजार
- 3. विकास वित्तीय संस्था
- 4. इतर संस्था

3) विकास वित्तीय संस्था

अखिल भारतीय वि. बँका	गुंतवणूक संस्था	राज्यस्थरिय संस्था	इतर उच्च संस्था
IFCI	LIC	SFCS	NABARD
ICICI	GIC	SIDBI	EXIM BANK
IDBI	UTI	SSIDBI	RRB
IIBI - etc		etc.	NHB

B) वित्तीय संस्था (Finacial institute)

बँक व्यवसाय

Reserve Bank of India - RBI

मध्यवर्ती बँक

सप्टेंबर 2020 ुसार बँकांची संख्या

- **व्यापारी बँका (Commercial Banks)**
  - **सार्वजनिक (12) (STI-2015)**
    - 1) SBI - 01
    - 2) राष्ट्रीयकृत बँका - 11
  - **खाजगी बँका (22)**
    - भारतीय
      - 1. जुन्या बँका
      - 2. नविन बँका
      - 3. स्थानिक बँका
    - **परकीय (46)**
- **सहकारी बँका (Co-operative Bank) त्रि-स्तरीय रचना**
  - **A) राज्य सहकारी बँक (शिखर बँक)**
  - **B) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (31)**
    - C) गाव पातळीवर
      - I) प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था
      - ii) नागरी सहकारी बँक
    - शहर पातळीवर

- **नोट :** SBI समुहाच्या विलीनीकरणानंतर सार्वजनिक बँकांची एकुण संख्या **26** वरुन **21** एवढी झाली आहे.
- बँक ऑफ बडोदा, देना बँक, विजया बँक या तीन राष्ट्रीयकृत बँकांच्या एकत्रिकरणानंतर राष्ट्रीयकृत बँकांची एकुण संख्या **17 असेल.**
- या तीन बँकांच्या एकत्रिकरणानंतर सार्वजनिक बँकांची एकुण संख्या **19 असेल. मार्च 2020 पासुन सध्या राष्ट्रीकृत बँकेची संख्या 12 आहे.**

C) वित्तीय साधणे :-

- नोटा, नाणी, हुंड्या, बॉन्ड, रोखे, शासकीय प्रतिकृती, कर्जपत्रे, चेक्स, डी.डी., चलन, ट्रेझरी बिले, रोखपत्रे, वाणिज्यीक पत्रे इत्यादी.
- वरील सर्व साधनांचा वित्तीय साधणे म्हणुन वापर केला जातो.

हुंडी :-

हुंडी म्हणजे दोन व्यापाऱ्यातील आर्थिक व्यवहाराची वचन चिठ्ठी होय. हुंडी देशी व परकीय असू शकते. बँका हुंड्या स्विकारुन कर्जे देतात. हुंडीचा कालावधी हा 90, 130, 365 दिवसांचा असू शकतो.

D) वित्तीय सेवा :-

- वित्तीय सेवामध्ये खालील घटकांचा समावेश होतो. ATM, Depositer machine, Online Banking, Net Banking, E-Banking, M-Banking.
- M-Banking म्हणजे Mobile Banking होय.
- Core Banking - म्हणजे -
  समान कार्य करणाऱ्या बँकांचा गट असतो या Core Banking चा वापर करुन कोणताही ग्राहक कोणत्याही बँकेशी आर्थिक व्यवहार करु शकतो.
  उदा. पैसे काढणे किंवा जमा करणे इत्यादी.
- बँकांकडून लॉकरची सुविधा दिली जाते, इत्यादी सुविधांचा समावेश वित्तीय सुविधेमध्ये किंवा सेवेमध्ये किंवा सेवेमध्ये होतो.

सध्या भारतीय बँकांची स्थिती

- भारतातील 2015 पर्यंत Big Four बँका.
  1. स्टेट बँक ऑफ इंडिया, 2.ICIC 3. बँक ऑफ बरोडा, 4. पंजाब नॅशनल बँक,
- भारतातील सर्वात मोठी सार्वजनिक बँक - SBI.
- जागतिक बँकेतील भारताचे प्रतिनिधी -
- सर्वात मोठी खाजगी बँक - ICICI.
- SEBI (Security Exchange Board of India)
- कृषी क्षेत्राला व ग्रामीण भागाला अर्थसहाय्य करणारी शिखर बँक - NABARD-1982.
- उद्योगाच्या विकासासाठी अर्थसाह्य करणारी शिखर बँक - IDBI-1964.
- भारतातील एकुण सार्वजनिक बँका - 12
- भारतातील राष्ट्रीयकृत बँका सध्या (2020) - 11
  1969 मध्ये 14 बँकांचे राष्ट्रीयकरण झाले व नंतर 1980 मध्ये 06 बँकांचे राष्ट्रीयकरण झाले. सध्या 19 राष्ट्रीयकृत बँका आहेत. कारण New Bank of India चे PNB मध्ये विलनीकरण (Merger) झाले.
- भारतातील सर्वात जास्त शाखा असलेली बँक - SBI
- प्रामुख्याने गृहकर्जे पुरवणारी बँक - HDFC
- India Post Payment Bank. स्थापना - 2015. भारतीय डाक/टपाल विभाग.

- भारतीयांनी स्थापन केलेली पहिली बँक - अवध कर्मशियल बँक - 1881
- पहिली पुर्ण भारतीय बँक - पंजाब नॅशनल बँक - 1894
- Regional Rural Bank (RRB) च्या पुरस्कृत बँका - राष्ट्रीयकृत बँकांचा गट
- भारतातील सर्वाधिक शाखा असलेली परकीय बँक - U.K. Bank
- परदेशात जास्त शाखा असलेली बँक - बँक ऑफ बडोदा.
- परेदशात सर्वाधिक देशात काम करणारी बँक - SBI
- जगात सर्वाधिक शाखा असलेली बँक - इंडस्ट्रियल कर्मशिअल बँक ऑफ चायना.
- ATM सुरु करणारी पहिली बँक - ICICI
- ISO - प्रमाणित पहिली बँक - कॅनरा बँक.
- इंटरनेट सुरु करणारी पहिली बँक - ICICI
- बँकींग नियामक संस्था - RBI
- विमा क्षेत्रातील नियामक संस्था - IRDA
- शेअर बाजाराची नियामक संस्था - SEBI
- आधारकार्ड व बायोमॅट्रीक बँकींग खात्याशी लिंक करणारी पहिली बँक - HDFC
- ग्रिन बॉण्ड सुरु करणारी पहिली बँक - HDFC

हुंडी	चेक
1. हुंडी व्यक्तीच्या नावे काढली जाते.	1. चेक बँकेच्या नावे काढला जातो.
2. व्यक्तीस हुंडी स्वीकारावी लागते.	2. बँकेस चेक स्वीकारण्याची गरज नसते.
3. हुंडीवे पैसे त्वरीत किंवा विशिष्ट कालांतराने मिळतात.	3. चेकद्वारे त्वरीत पैसे मिळतात.
4. हुंडीचे रेखांकन होवू शकत नाही.	4. चेकने रेखांकन होवू शकते.
5. हुंडीचे पैसे थांबवावेत असा आदेश देता येत नाही.	5. चेकचे पैसे थांबविण्याचा आदेश देता येतो.
6. हुंडीबाबत स्टॅम्प डयूटी भरावी लागते.	6. चेकबाबत स्टॅम्प डयुटी भरावी लागत नाही.
7. हुंडीबाबत मुदतीनंतर सामान्यतः तीन अनुग्रह दिनाची सवलत मिळते.	7. चेकबाबत अनुग्रह दिन सवलत मिळत नाही.

Reserve Bank of India - RBI

- RBI ही भारतातील सर्वात मोठी सर्वोच्च वित्तीय संस्था होय. जी मध्यवर्ती बँक म्हणून सुद्धा ओळखली जाते. (Appex Financial Institution)
- RBI कडून मौद्रिक धोरण (Monetary Policy) जाहीर केले जाते.
- RBI ला मध्यवर्ती बँक, केंद्रीय बँक, केंद्रीय अधिकोश, बँकांची बँक अंतिम ऋणदाता, शासकीय बँक इत्यादी नावाने ओळखले जाते.
- Mr. Will Rogars विल रॉजर्स च्या मते, "अग्नी व चक्रानंतर, मध्यवर्ती बँक हा मानवाने शोधून काढलेला तिसरा सर्वात महत्त्वाचा शोध होय."
- 1656 मधील 'रिस्क बँक ऑफ स्वीडन' ही पहिली मध्यवर्ती बँक होय पण खऱ्या अर्थाने 1694 मधील बँक ऑफ इंग्लंड ही पहिली बँक समजली जाते.
- 1913 फेडरल बँक - USA मधील मध्यवर्ती बँक होय.
- 1 एप्रिल, 1935 - मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) ची स्थापना करण्यात आली.
- 1771 - मध्ये भारतात मध्यवर्ती बँक असावी अशी कल्पना वॉरन हेस्टिंगजने मांडली आहे.
- 1926 - मध्ये 'यंग हिल्टन आयोगाने' मध्यवर्ती बँकेची शिफारस केली आहे.
- 6 मार्च 1934 - ला RBI कायदा करण्यात आला. यानुसार RBI ची स्थापना करण्यात आली.

भागभांडवल :-

- RBI च्या स्थापनेवेळी एकुण भांडवल 5 कोटी होते.
- सुरुवातीला RBI खाजगी बँक होती (1935 ते 1948) कारण 100 रुपयाप्रमाणे 5 लाख शेअर विकून भांडवल जमा केले गेले जे खाजगी व्यक्तीचे होते.
- 1942 पर्यंत ब्रह्मदेश तर 30 जून 1948 पर्यंत पाकिस्तानची मध्यवर्ती बँक म्हणुन काम पाहिले.

RBI चे राष्ट्रीयीकरण :-

- 7 एप्रिल, 1935 RBI चे एकुण भागभांडवल खाजगी लोकांचे होते.
- 1948 - रिझर्व्ह बँक सार्वजनिक मालकी हस्तांतरण कायदा संमत केला.
- RBI या कायद्यान्वे राष्ट्रीयकरण केले गेले.
- खाजगी लोकांचे 100 रु. चे शेअरस 118.1 रु. या दराने शासनाने परत दिले व अशा प्रकारे RBI चे राष्ट्रीयकरण करण्यात आले.
- RBI भारत व ब्रह्मदेश दोन्हीसाठी कार्य करत होती 5 जून 1942 ब्रह्मदेश वेगळा झाला तरी 31 मार्च, 1947 पर्यंत RBI ब्रह्मदेश सरकारची बँक म्हणून काम करत होती.
- तर 30 जून 1948 पर्यंत पाकिस्तानसाठी देखील RBI ने कार्य केले होते.

RBI चे व्यवस्थापन (संचालक मंडळ) :-

- RBI चे व्यवस्थापन 'मध्यवर्ती संचालक मंडळाकडे' आहे. एकुण सदस्य संख्या 20 आहे.

Join @Rajmudralatur_Ecospecial

- त्यापैकी गव्हर्नर व चार डेप्युटी गव्हर्नर नियुक्त केले जातात.
- त्यांचा कार्यकाल हा पाच वर्षापर्यंत असतो व RBI चे गव्हर्नर पुर्ननियुक्तीसाठी प्राप्त असतात.
- गव्हर्नर हा मुख्य कार्यकारी अधिकारी असतो.

RBI ची उत्क्रांती

एप्रिल१, १९३५	- भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना
जानेवारी१, १९३५	- रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टच्या काही भागाची अंमलबजावणी सुरु.
मार्च ६, १९३४	- रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टला त्यावेळच्या गव्हर्नर जनरलची मान्यता.
फेब्रु.१६, १९३४	- आरबीआय विधेयकास कॉन्सील ऑफ स्टेट्सची मंजूरी
डिसें.२२, १९३३	- आरबीआय विधेयकास लेजिस्लेटीव्ह असेंब्लीकडून मंजूरी
सप्टें.८, १९३३	- भारतीय लेजिस्लेटीव्ह असेंब्लीत नवीन आरबीआय विधेयक मांडण्यात आले.
जानेवारी १९२७	- सुवर्ण परिणाम व आरबीआय विधेयक मांडण्यात आले परंतु त्यावेळी विधेयक पुढे सरकु शकले नाही.
१९२१	- १९२१ साली तीन इलाखा बँकाचे (बँक ऑफ बेगॉल, बँक ऑफ बॉम्बे व बँक ऑफ मद्रास) एकत्रीकरण करुन इंपिरियल बँक ऑफ इंडियाची स्थापना केली.
१८४३	- बँक ऑफ मद्रासची स्थापना
१८४०	- बँक ऑफ बॉम्बेची स्थापना
२ जून १८०६	- बँक ऑफ कलकत्ताची स्थापना
जाने. १७७३	- बंगाल व मुंबई येथे मध्यवर्ती बँकेची स्थापना करावी अशी वॉरन हेस्टींग्ज याने शिफारस केली.

संचालक मंडळ - 20 सदस्य

1. गव्हर्नर/महासंचालक - 1 - कालावधी 5 वर्षे
2. संचालक - 4 - कालावधी 3 वर्षे - स्थानिक प्रमंडळे
3. इतर संचालक - 6 - केंद्र शासनाने नामांकित केलेले
4. उप महासंचालक - 2 - केंद्रशासनाने 5 वर्षासाठी निवड
5. शासनाचे अधिकारी - 1 - नेमणुक केंद्रशासन

स्थानिक प्रमंडळे - मुंबई, नवी दिल्ली, कोलकत्ता, चेन्नई.

सध्याचे गव्हर्नर - शक्तीकांत दास (25 वे). नियुक्ती - 11 डिसेंबर, 2018 (3 वर्षासाठी)

- **RBI गव्हर्नर पदाचा कालावधी व पात्रता -** 5 वर्षाचा असतो. ते पुर्ननियुक्तीस पात्र असतात. RBI च्या गव्हर्नर पदासाठी कोणत्याही बँकाचा 10 वर्षे संचालक असावा. त्या व्यक्तीस लेख्यांविषयी माहिती असावी. तो अर्थतज्ज्ञ, गणिततज्ज्ञ किंवा संख्या शास्त्रज्ञ असावा.
- **डेप्युटी गव्हर्नर - 1. एन.एस. विश्वनाथन, 2. विरल आचार्य, 3. बी.पी. कांगो, 4. महेशकुमार जैन**
- इतर संचालक 15 सदस्य त्यांना कार्यालयाबाहेरील सदस्य म्हणतात.

RBI गव्हर्नर

	गव्हर्नर	कालावधी
1.	सर ओसबोर्न स्मिथ	1 एप्रिल 1935 ते 30 जुन 1937
2.	जेम्स ब्रेड टेलर	1 जुलै 1937 ते 17 फेब्रुवारी 1943
3.	सी.डी. देशमुख	11 ऑगस्ट 1943 ते 30 जुन 1949 (पहिले भारतीय)
4.	बेनेगल रामा राव	1 जुलै 1949 ते 14 जानेवारी 1957 (सर्वात जास्त वेळ)
5.	के.जी. अम्बेगावकर	14 जानेवारी 1957 ते 28 फेब्रुवारी 1957
6.	एच.वी.आर. आयंगर	1 मार्च 1957 ते 28 फेब्रुवारी 1962
7.	पी.सी. भट्टाचार्य	1 मार्च 1962 ते 30 जुन 1967
8.	एल.के. झा	1 जुलै 1967 ते 3 मे 1970
9.	बी.एन. आदरकार	4 मे 1970 ते 15 जुन 1970
10.	एस. जगन्नाथन	16 जुन 1970 ते 19 मे 1975
11.	एन.सी. सेनगुप्ता	19 मे 1975 ते 19 ऑगस्ट 1975
12.	के.आर. पुरी	20 ऑगस्ट 1975 ते 2 मे 1977
13.	एम. नरसिंहम	3 ते 1977 ते 30 नोव्हेंबर 1977
14.	डॉ. आइ.जी. पटेल	1 डिसेंबर 1977 ते 15 सप्टेंबर 1982
15.	डॉ. मनमोहन सिंग	16 सप्टेंबर 1982 ते 14 जानेवारी 1985 (पंतप्रधान झालेले)
16.	ए. घोष	15 जानेवारी 1985 ते 4 फेब्रुवारी 1985 (सर्वात कमी वेळ)
17.	आर.एन. मल्होत्रा	4 फेब्रुवारी 1985 ते 22 डिसेंबर 1990
18.	एस. वेंकटरमन	22 डिसेंबर 1990 ते 21 डिसेंबर 1992
19.	सी. रंगराजन	22 डिसेंबर 1992 ते 21 नोव्हेंबर 1997
20.	डॉ. विमल जालान	22 नोव्हेंबर 1997 ते 6 सप्टेंबर 2003
21.	डॉ. वाय.व्ही. रेड्डी	6 सप्टेंबर 2003 ते 5 सप्टेंबर 2008
22.	डी. सुब्बाराव	5 सप्टेंबर 2008 ते 4 सप्टेंबर 2013
23.	रघुराम राजन	5 सप्टेंबर 2013 ते 4 सप्टेंबर 2016
24.	उर्जित पटेल	5 सप्टेंबर 2016 ते 10 डिसेंबर 2018 (राजीनामा)
25.	शक्तिकांत दास	11 डिसेंबर, 2018 - सध्या पदावर कार्यरत.

☞ दास हे तमिळनाडु च्या 1990 च्या बॅचचे सेवानिवृत्त IAS अधिकारी आहेत.

☞ 15 व्या वित्त आयोगाचे पुर्णवेळ सदस्य होते.

☞ G-20 मध्ये भारताचे प्रतिनिधी शेरपा सदस्य होते.

☞ यापुर्वी अर्थमंत्रालयात आर्थिक सल्लागार या पदावर कार्यरत होते.

☞ तामिळनाडु राज्य शासनाच्या वेगवेगळ्या समित्यावर व आयोगावर दास यांनी कार्य केले आहे.

☞ RBI 25 वे गव्हर्नर म्हणुन दास यांची तीन वर्षासाठी निवड झाली आहे.

RBI चे प्रकाशने :

वार्षिक (Annual) :-

1. Annual Report,
2. Report on Trend and Progress of Banking in India

सहामाहीक (Half yearly) :-

1. Financial Stability Report,
2. Monetary Policy Report,
3. Report on Foreign Exchange Reserves.

द्विमासिक (Bi-monthly) :-

1. Surevy of Professional Forecasters.

मासिक (Monthly) :-

1. Monetary and Credit Information Review,
2. RBI Bulletin.

साप्ताहिक (Weekly) :-

1. Weekly Statistical Supplement - Extract,
2. Weekly Statistical Supplement

RBI चे कार्ये :-

☛ RBI दरवर्षी 30 जुनला जमाखर्च केंद्राकडे सादर करते त्यानुसार **1 जुलै ते 30 जुन** RBI चे आर्थिक वर्ष आहे.

2021 पासुन आरबीआयचे आर्थिक वर्ष 1 एप्रिल ते 31 मार्च हे असेल.

RBI चे कार्ये :-

1) चलन विषयक कार्य

2) शासनाची बँक

3) मौद्रिक धोरण राबवणे (पतधोरण)

4) बँकांची बँक :-

5) परकीय चलनसाठ्याचा संभाळ करणे.

6) विनिमय दरात स्थैर्य राखणे.

7) विकासात्मक कार्ये करणे.

8) देणी व व्यवहारातील नियंत्रण ठेवणे.

9) बँकांना परवाना देणे.

10) बँकांचे विलनीकरण करणे. इत्यादी कार्ये RBI कडून पार पाडली जातात.

1) चलन विषयक कार्ये (Issuing Notes) :-

- RBI च्या 1934 च्या कायद्याचे सेक्शन 22 नुसार RBI ला चलननिर्मितीचा अधिकार मिळाला आहे.
- या एकुण चलनापैकी नाणी (Coins) व 1 रु. ची नोट वगळता इतर चलन RBI निर्माण करते.
- चलन निर्मितीसाठी 1929 ते 1957 पर्यंत भारतात **'प्रमाण निधी पद्धत' (Minimum Drawing Rights Method)** वापरली जात होती.
- 1956 च्या कायद्यानुसार 1957 पासून किमान निधी पद्धत चा वापर केला जातो.
- यानुसार RBI ला किमान 200 कोटी रुपयाचा निधी जवळ बाळगावा लागतो व त्यापैकी 115 कोटी रुपयाचे सोने 85 कोटीचे परकीय चलन/कर्जरोखे इत्यादी स्वरुपात ठेवले जातात व त्यानुसार चलननिर्मिती केली जाते.

2) शासनाची बँक (Banker to Govt.) :-

- 1934 च्या कायद्यातील कलम 20, 21, 9, 21A अंतर्गत RBI शासनासाठी विनामूल्य सेवा (वित्तीय सेवा) पुरवते.
- शासनाची बँक म्हणून.
- शासनाला बँकसेवा पुरवते.
- सरकारी रोखे विकुण कर्ज पुरवठा.
- तुट भरुण काढण्यासाठी चलन निर्मिती करते.
- शासकीय व्यवहार पहाणे, शासकीय लेखे सांभाळणे.
- आर्थिक बाबींवर सल्ले देणे इत्यादी कार्ये RBI शासनासाठी करते.

3) मौद्रिक धोरण राबवणे (पतधोरण) - Monetary Policy :-

- अर्थव्यवस्थेचे व आर्थिक नियोजनासाठी RBI कडुन मौद्रिक धोरण जाहीर केले जाते.
- दर दोन महिन्याला RBI पत धोरण/मौद्रिक धोरण जाहीर करते.
- किंमत स्थैर्य, आर्थिक स्थैर्य, पैशाचा पूरवठा नियंत्रण करणे हा उद्देश असतो. उदा. SLR, CRR, Bank Rate, etc.

4) बँकांची बँक :-

- मध्यवर्ती बँकेचे देशातील सर्व बँकांवर नियंत्रण असते.
- देशातील सर्व बँकांचे RBI मध्ये Account असते.
- शाखा विस्तार व स्थापनेसाठी बँकांना RBI ची परवानगी घ्यावी लागते.
- बँकांची अंतिम ऋणदाता म्हणुन काम करते.
- RBI ने ठरवून दिलेल्या दराची अंमलबजावणी इतर बँका करतात.
  उदा. CRR, SLR, etc.
- निरसन गृह चालवने (Clearing Houes), बँकांना मार्गदर्शन इत्यादी.

RBI चे मौद्रिक धोरण

- RBI दर दोन महिन्याला मौद्रिक धोरण जाहीर करते. मौद्रिक धोरण जाहीर करणे आरबीआयचे महत्वाचे कार्य आहे.
- 2016 पुर्वी धोरण जाहीर करण्याचा अधिकार आरबीआयच्या संचालक मंडळास होता.
- 2016 पासुन मौद्रिक धोरण हे मौद्रिक समिती ठरवते.
- 2014 पासुन मौद्रिक धोरण जाहीर करण्यासाठी ग्राहक किंमत निर्देशांकाचा उपयोग केला जातो. पूर्वी घावूक किंमत निर्देशांक वापरला जात असे.

मौद्रिक धोरणाचे उद्दिष्ट्ये

1. आवश्यक द्रव्यविषयक / पैशाची गरज भागवणे.
2. विकसनशिल देशात गुंतवणुकीचे प्रमाण वाढवणे.
3. पैशाचे नियंत्रण व नियमन करणे.
4. भाववाढ व भावघट नियंत्रणात ठेवणे.
5. विनिमय दरात स्थैर्य राखने.
6. व्यापार चक्राचे नियंत्रण करणे.
7. विकासाला गती दणे.

मौद्रिक धोरण समिती (MPC)

सुधारीत RBI कायदा 1934 मधील कलम 45ZB नुसार चलनविषयक धोरण समितीची तरतुद करण्यात आली असून केंद्र शासनाद्वारे चलनविषयक धोरण समिती पुढीलप्रमाणे नेमण्यात येईल.

चलनविषयक धोरण समितीमध्ये सहा सदस्य असतील.

1. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर - शक्तीकांत दास
2. रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर - चलनविषयक धोरणाचे इनचार्ज - डॉ.मायकेल पत्रा.
3. मध्यवर्ती बँकेचे एक अधिकारी - डॉ.मृदुल के.सागर
4. केंद्र सरकारचे तीन प्रतिनिधी असतात.
   1.प्रा.आशिमा गोयल
   2.प्रा.जयंत आर.वर्मा 3. डॉ.शशांक भिडे

रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांना निर्णायक मताचा अधिकार असेल परंतु व्हेटोचा अधिकार नसेल. चलनविषयक धोरण समितीच्या वर्षातून किमान चार बैठका होतील. चलनविषयक धोरण समितीची बैठकीसाठीची किमान गणसंख्या चार सदस्य इतकी असेल.

उर्जित पटेल समिती -

स्थापना - 12 सप्टेंबर , 2013

अहवाल - 21 जानेवारी 2014

सदस्य - डॉ.पी.जे.नायक, प्रा.चेतन घाटे, प्रा.पीटर जे.मॉटियल, डॉ.साजिद जडे

उद्देश - चलनविषयक धोरणाच्या आकृतीबंदाचे विश्लेषण करणे व ते मजबूत करणे

शिफारशी -

1. चलनविषयक धोरण निश्चितीसाठी RBI द्वारे एक नवीन उपभोक्ता मूल्य निर्देशांक निश्चित करावा.
2. चलनविषयक धोरण निर्णय चलन विषयक धोरण समितीच्या हातात देणे, जिचे अध्यक्ष RBI गव्हर्नर असतील.
3. बाजार स्थितीकरण योजना व रोख व्यवस्थापन बिल बंद करण्यात यावे.
4. वर्ष 2016-17 पर्यंत राजकोषीय तुट 3% पर्यंत कमी करणे

RBI चे पतधोरण / मौद्रिक धोरण / चलन विषयक धोरण (Monetary Policy)

संख्यात्मक साधणे

प्रत्यक्ष साधणे

CRR

SLR

अप्रत्यक्ष साधणे

- Bank Rate / बँक दर
- रेपो दर
- रिव्हिस रेपो दर
- मुळदर (Base Rate)
- MSF
- खुल्या बाजार रोख्याची खरेदी-विक्री (OMO) - Open Market operation

गुणात्मक साधणे

१. कर्ज रक्कम व तारण यातील गाळा ठरविणे.
२. उपभोग कर्जाचे नियंत्रण.
३. नैतिक समजावनी.
४. प्रसिद्धी
५. प्रत्यक्ष कार्यवाही
६. आदेशाद्वारे नियंत्रण
७. मार्गदर्शन

● 2018-19 या वर्षातील RBI मौद्रिक धोरण :-

RBI दर दोन महिन्याला म्हणजे वर्षातुन 6 वेळा मौद्रिक धोरण जाहीर करते.

पहिले मौद्रिक धोरण -	05 एप्रिल, 2018
दुसरे मौद्रिक धोरण -	06 जुन, 2018
तिसरे मौद्रिक धोरण -	01 ऑगस्ट, 2018
चौथे मौद्रिक धोरण -	04 ऑक्टोबर, 2018
पाचवे मौद्रिक धोरण -	05 डिसेंबर, 2018
सहावे मौद्रिक धोरण -	06 फेब्रुवारी, 2019

● सध्याचे दर :-

डिसेंबर, 2021 चौ मौद्रिक धोरण -

i)	रेपो दर	- 4.00%
ii)	रिव्हर्स रेपो दर	- 3.35%
iii)	सीमांत पर्यायता दर (MSF)	- 4.25%
iv)	बँक दर	- 4.25%
v)	CRR	- 4.00%
vi)	SLR	- 18.00%

● **पूर्वीचे दर :-**

क्र.	व्याज दर	1 ऑगस्ट, 2018	6 जुन, 2018	5 एप्रिल, 2018	17 एप्रिल 2020
i)	रेपो दर	6.50%	6.25%	6.0%	4.40%
ii)	रिव्हर्स रेपो दर	6.25%	6.0%	5.75%	4.00%
iii)	सीमांत पर्यायता दर (MSF)	6.75%	6.50%	6.25%	4.65%
iv)	बँक दर	6.75%	6.50%	6.25%	4.65%
v)	CRR	4.0%	4.0%	4.0%	4.00%
vi)	SLR	19.5%	19.5%	19.5	18.25%

❍ प्रत्यक्ष साधणे :-

1) ¸ÖêÖ¸ü ÖßÖê×-ÖÖ- CRR (Cash Reserve Ratio) :

- देशातील बँकांना एकुण उत्पन्नाच्या (म्हणजे निव्वळ मागणी + मुदती ठेवीच्या) प्रमाण मध्यवर्ती बँकेत विशिष्ट रक्कम ठेवावी लागते त्यास CRR म्हणतात.
- CRR ची रक्कम रोख स्वरुपात बँकांना RBI कडे ठेवावी लागते.
- 1990 मध्ये CRR 15% होता.
  1991 च्या नरसिंहम् यांच्या शिफारशीवरुन CRR चे प्रमाण 5.5% आणले गेले व टप्प्याटप्प्याने कपात करण्याची सुचना केली.
- एप्रिल 2018 च्या पतधोरणानुसार CRR 4% आहे.
- गैर-अनुसूचित बँका CRR स्वत:कडे ठेवू शकतात.
  (Note : दर तीन महिन्याला पतधोरण जाहीर होते.)
- CRR कमी केल्यामुळे बँकांची रोखता वाढते व पैशाचा पुरवठा वाढतो.

2) वैधानिक तरलता प्रमाण - SLR (Statutory Liquidity Ratio) :

- बँकांना त्यांच्या उत्पन्नाच्या विशिष्ट प्रमाण स्वत:कडे जी रक्कम ठेवता येते त्यास SLR म्हणतात.
- SLR रोख किंवा प्रतिभूतीच्या स्वरुपात ठेवता येतो.
  प्रतिभूति म्हणजे - Security, Bond, Shares, etc.
- 1991 मध्ये SLR - 38.5% होता.
- नरसिंहम् समितीच्या शिफारशीवरुन 25% पर्यंत कमी करणे.
- 1962 च्या कायद्याप्रमाणे SLR चे प्रमाण कमीतकमी 25% व जास्तीत जास्त 40% पर्यंत ठेवता येते.
- SLR सध्या 19.5% आहे. काळानुसार SLR च्या प्रमाणात घट करण्यात आली आहे.
  नरसिंहम समितीनुसार आरबीआयने व्यापारी बँकेवर लादलेला कर होय.

3) बँक दर - (Bank Rate) :

"मध्यवर्ती बँकेकडून व्यापारी बँकांना ज्या दराने कर्ज पुरवठा केला जातो. त्या दरास बँक दर म्हणतात"

किंवा

"ज्या दराने व्यापारी बँका हुंड्या वटवितात जातात त्यास बॅकदर म्हणतात."

2021 नुसार बँक दर हा **4.25%** आहे.

- बँक दरात बदल झाल्यास बाजार दर बदलतो. या दोन्ही भिन्न संकल्पना आहेत.
- व्यापारी बँका ज्या दराने कर्ज देतात त्यास बाजार दर म्हणतात.
- बँक दरात ↑ बाजार दर ↑
  बँक दरात ↓ बाजार दर ↓
- बँक दरवाढीमुळे कर्ज महागतात, बँकांची रोखता कमी होते त्यामुळे व्याजदर वाढतात.

4) रेपो दर :

"रेपो म्हणजे पुर्नखरेदीचा करार होय."

"RBI कडून व्यापारी बँकांना कर्ज पुरवठा केला जातो, शासकीय प्रतिभूतीची खरेदी करुन कर्ज पुरवठा केला जातो.

- मध्यवर्ती बँक शासकीय रोख्यांची खरेदी करुन ज्या दराने व्यापारी बँकांना कर्ज देते त्यास रेपो दर म्हणतात."
- हे कर्ज अल्पकाळासाठी म्हणजे 1 ते 28 दिवसासाठी असते यानंतर व्यापारी बँका अशी रोखे पुन्हा खरेदी करतात.
- म्हणुन एका प्रकारे रेपो दराला वटाव दर म्हणतात.
- रेपो दरात कपात केल्यामुळे बँकांची तरलता (बँकांकडील रोख पैसा) वाढते.
- भाववाढ / चलनवाढ असतात रेपो दरात वाढ केली जाते. त्यामुळे बँका कर्ज घेत नाहीत व तरलता कमी होते. पर्यायाने अर्थव्यवस्थेतील पैसा कमी होतो व भाववाढ नियंत्रणात येते. सध्या डिसेंबर 2021 नुसार रेपो दर हा **4.0%** आहे.

5) रिव्हर्स रेपो दर - (Reverse Repo Rate) :

"या व्यवहारात व्यापारी बँका मध्यवर्ती बॅकेकडून शासकीय रोखे खरेदी करुन एक प्रकारे मध्यवर्ती बँकेलाच कर्ज पुरवठा करतात त्या दरास रिव्हर्स रेपो म्हणतात."

- हे कर्जसुद्धा अल्पकालीन म्हणजे 1 ते 28 दिवसासाठी असते.
- करारानंतर RBI पुन्हा व्यापारी बँकांकडून शासकीय रोखे खरेदी करते.
  सध्या रिव्हर्स रेपो दर हा **5.75** आहे.

6) सीमांत राखीव सुविधा - (MSF - Marginal Standing Facility) :

- 2011 पासून ही सुविधा अनुसूचित व्यापारी बँकासाठी पुरवली जाते.
- व्यापारी बँका त्यांच्याकडे असलेल्या SLR मध्ये 2% पर्यंत कपात करता येते. ही रक्कम समजली जाते.
  हा दर रेपोदरापेक्षा 1% नी जास्त असतो.
  सध्या एप्रिल 2018 नुसार **6.25%** आहे.
  RBI बँक दराएवढा MSF चा दर असतो.

7) खुल्या बाजारातील व्यवहार - (Open Market Operation) :

रोखता / तरला कमी-अधिक करण्यासाठी खुल्या बाजारात शासकीय रोख्यांची खरिदी विक्री केली जाते.

भाववाढ असतांना - रोख्यांची विक्री - पैशाच्या पुरवठयात घट
भावघट असतांना रोख्यांची खरेदी - पैशाच्या पुरवठयात वाढ

8) मुळ दर - (Base Rate) :

- 1994 - RBI कडून PLR प्रधान व्याजदर निश्चित करत असे. या दरापेक्षा कमी व्याजदाराला कर्ज पुरवठा केला जात नसे.
- 2004-05 मध्ये BPLR (Benchmark Prime Lending Rate) पद्धत सुरु केली गेली.
- मागील वर्षी ज्या दराने कर्ज पुरवठा केला होता त्या दराने कर्ज पुरवठा केला जातो.
- जुलै 2010 मध्ये RBI बेसदर पद्धत लागू केली. विविध बँकांची कर्ज Base Rate वर अवलंबून असतात. एप्रिल 2018 मध्ये 8.70% ते 9.45% होता.

9) कॉल दर -

(Call Rate) : 2.00 ते 3.90 :

बाजारातील रोख्यांच्या खरेदी-विक्रीचा दर.

❍ गुणात्मक साधणे :-

1) तारण मूल्य व कर्जे रक्कम यातील गाळा ठरविणे :-

- बँका योग्य प्रकारच्या तारणावरच कर्ज देतात, तारणाच्या बाजारमूल्याच्या काही टक्केच कर्ज दिले जाते. तारणाचे बाजारमूल्य व कर्जाची रक्कम यातील टक्केवारीतील फरक म्हणजे तारणाची मर्यादा किंवा गाळा होय.
  उदा. 1000 रु. तारण वस्तूची किंमत असेल तर गाळा 20% तर कर्जे 800 रु. इतके दिले जाईल.

2) उपभोग्य कर्जाचे नियंत्रण.

3) कर्जाचे रेशनिंग.

4) नैतिक समजावनी

5) प्रसिद्धी :- उदा. आकडेवारी, पतधोरण इत्यादी सांख्यिकीय आकडेवारी.

राष्ट्रीयकृत बँक

12 Public Sector Banks of India

www.askbankifsccode.com

- भारतात सर्वप्रथम RBI चे राष्ट्रीयकरण झाले आहे. 1 जाने. 1949

- 1955 मध्ये SBI चे राष्ट्रीयकरण झाले आहे.

- 19 जुलै 1969 - 14 बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. ज्या बँकांचे भांडवल 50 कोटी पेक्षा जास्त आहे.
- 15 एप्रिल 1980 मध्ये 06 बँकांचे राष्ट्रीयकरण झाले. ज्यांचे भांडवल 200 कोटीपेक्षा जास्त होते.
- 4 सप्टेंबर 1993 New India Bank चे PNB मध्ये रुपांतर झाले.
- 1993 नंतर 19 राष्ट्रीयकृत बँका होत्या.
- बँक ऑफ बडोदा + देना बँक + विजया बँक या तीन राष्ट्रीयकृत बँकांच्या विलनीकरणानंतर राष्ट्रीयकृत बँकाची संख्या 17 होती.

तर सार्वजनिक बँकांची संख्या - 19 होती.

सध्या सार्वजनिक बँकांची संख्या :-

राष्ट्रीयकृत बँका		विलीनीकृत बँका
1. SBI -		
2. PNB -	←	Oriental Bank of commerce
	←	United Bank of India
3. Bank of Baroda		
4. Canara Bank -	←	Sundicate Bank
5. Unian Bank of India -	←	Andhra Bank
	←	Corporation bank
6. Bank of India		
7. Indian Bank -	←	Allahabad Bank
8. Central Bank of India		
9. Indian Overseas Bank		
10.UCO Bank		
11. Bank of Maharashtra		
12. Pubjab & Sind Bank		

19 जुलै 1969 मध्ये राष्ट्रीयीकरण झालेल्या 14 बँका

1. अलाहाबाद बँक
2. बँक ऑफ बडोदा
3. बँक ऑफ इंडिया
4. कॅनरा बँक
5. बँक ऑफ महाराष्ट्र
6. सेंट्रल बँक ऑफ इंडिया
7. देना बँक
8. इंडियन बँक
9. इंडियन ओव्हरसीज बँक
10. पंजाब नॅशनल बँक
11. सिंडीकेट बँक
12. युको बँक
13. युनियन बँक ऑफ इंडिया
14. युनायटेड बँक ऑफ इंडिया

15 एप्रिल 1980 मध्ये राष्ट्रीयीकरण झालेल्या 6 बँका

1. आंध्र बँक
2. कॉर्पोरेशन बँक
3. न्यू बँक ऑफ इंडिया
4. ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स
5. पंजाब आणि सिंध बँक
6. विजया बँक

पेमेंट बँक

- आर्थिक समावेशकता हे मुख्य धोरण डोळयासमोर ठेवून RBI ने पेमेंट बँका सुरु केल्या आहेत.
- अल्प उत्पन्न गटातील लोकांना, सिमांत व्यवसायीकांना सर्वदूर बँकिंग जाळे पसरविण्यासाठी पेमेंट बँकेची स्थापना करण्यात आली.
- RBI ने नोव्हेंबर 2014 मध्ये पेमेंट बँकेच्या लायसेन्स बाबतची मार्गदर्शक नियमावली जाहीर केली आहे.
- 11 एप्रिल 2016 ला पेमेंट बँकांना परवाना देण्यात आला आहे.
- 19 ऑगस्ट 2015 रोजी 11 पेमेंट बँकांना परवाना देण्यात आला आहे.
- 1 एप्रिल 2016 ला 1 ली पेमेंट बँक म्हणुन Airtel Payment Bank स्थापन झाली आहे.

नियमावली /अटी

- किमान भांडवल मर्यादा 100 कोटी रुपये असणे आवश्यक आहे.
- पहिले 5 वर्षे प्रवर्तकाची हिस्सेदारी किमान 40% असावी.
- 1949 बॅंकिंग नियमन कायदा लागू असेल.
- या बँकांनी Payment Bank हा शब्द वापरला पाहिजे.
- 25% शाखा ग्रामीण भागात असल्या पाहिजेत.

उद्देश - वित्तीय समावेशकता वाढवणे.
आर्थिक समावेशकता वाढवणे.

सध्या सुरु असलेल्या पेमेंट बँका

1.	Airtel Payment Bank	-	New Delhi
2.	Fino Payment Bank	-	Mumbai
3.	Indian Post Payment Bank	-	New Delhi
4.	Jiyo Payment Bank	-	Mumbai
5.	Paytm Payment Bank	-	Noida
6.	Aditya Birla Payment Bank	-	Mumbai
7.	NSDL Payment Bank	-	Mumbai
8.	Vodafone -M-Pesa Payment Bank	-	Mumbai

पेमेंट बँकेचे कार्य :-

1. ठेवी स्विकारणे - सुरुवातीस पेमेंट बँकांना 1 लाखापर्यंत ठेवी स्विकारण्याची परवानगी होती ती वाढवून 2 लाख करण्यात आली आहे.
2. पेमेंट बँका ATM Card / Debit Card देवू शकतात.
3. **पेमेंट बँका Credit Card देवू शकत नाही.**
4. विविध देयके देण्याची सुविधा Payment बँका देतात.
5. पेमेंट बँका व्यक्तीगत व कोणत्याही स्वरुपाचे कर्ज देवू शकत नाहीत.
6. पेमेंट बँकांना भांडवल पर्याप्तता प्रमाण (Capital Adequancy) 15% असणे आवश्यक आहे.
7. पासबुक देणे बंधनकारक नाही पण अशी मागणी ग्राहकाने केल्यास योग्य ती फिस आकारता येईल.
8. एकूण ठेवींच्या 75% रक्कम सरकारी कर्ज रोखे / ट्रेझरी मध्ये गुंतवावी लागेल ज्यांची मुदत 1 वर्षापेक्षा कमी असेल.
9. परदेशात पाठवण्याची रक्कम किंवा परदेशातून येणारी रक्कम जमा करण्याची सुविधा देवू शकतात.
10. विमा, मोटार विमा, आरोग विमा इत्यादी करार करुन देण्यात येईल.

Bad Bank

- **केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी 2021-22 च्या अर्थसंकल्पात Bad Bank ची घोषणा केली आहे.**
- Bad Bank च्या स्थापनेसाठी 20,000 कोटीचे भांडवल दिले आहे.
- वाढते NPA - (Non Performoing Assets) चे प्रमाण कमी करण्यासाठी बॅड बँकेची स्थापना करण्यात येत आहे.
- बॅड बँक म्हणजे ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी होय.
- व्यापारी बँकांचे बुडीत कर्ज खाते बॅड बँकेकडे वर्ग केले जाणार आहेत.
- देशातील वित्तीय संकटाच्या काळात बॅड बँका स्थापन केल्या जातात.
  उदा. 2008 मध्ये अमेरिकेत बॅड बँकेची स्थापना करण्यात आली.
  2009 मध्ये आयर्लंड मध्ये अशी बँक स्थापन करण्यात आली.

जगातील पहिली बॅड बँक USA मध्ये - 1988 - मेलॉन बँक म्हणून स्थापन करण्यात आली.

- भारतात बॅंकिंग क्षेत्रातील बुडीत कर्जाच्या वाढत्या समस्येमुळे बॅड बँकेची घोषणा केली आहे.
- भारतातील दोन लाख कोटी रुपयांची अनेक बुडीत कर्जे मिळवण्याचे काम या बँकांना देण्यात आले आहे.
- बुडीत कर्ज मिळाल्यानंतर IDRCL या कंपनीद्वारे या मालमत्ता बाजारात विकल्या जातील.
- Bad Bank या कार्पोरेट संस्था आहेत. या बँका इतर बँकाकडे असणाऱ्या धोकादायक मालमत्ता दूर करतात.
- बँकांना त्यांची बुडीत कर्ज हस्तांतरीत करुन बँकांचे ताळेबंद सुधारण्यासाठी उपयुक्त आहेत.
- भारतात बुडीत कर्जाचे प्रमाण जास्त आहे.
  सप्टेंबर 2021 मध्ये असोचेम आणि क्रिसिलीन ने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार व्यावसायिक बँकाचे एकूण NPA 10 ट्रिलियनच्या पुढे आहे.

Best Bank Awards - 2021

- India's Best domestic Bank - 2021 - Kotak Mahindra Bank
- India's Best corporate and investment Bank - 2021 - Kotak Mahindra Bank
- India's Best International Bank - DBS Bank
- India's Best Digital Bank - 2021 - AXIS Bank
- India's Best Digital Bank - 2021 - Axis Bank
- India's Best Bank for MSMS - HDFC

बँकीग नियमन कायदा – १९४९

- १७ फेब्रुवारी १९४९ रोजी कायदा संमत करण्यात आला.
- २६ मार्च १९४९ पासुन अंमलबजावणी
- यानुसार आरबीआयला व्यापक अधिकार मिळाले.

बँकींग नियंत्रण कायदा - 1949 नुसार बँकाचे नियमन करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेला असून वैधानिक नियमनांबरोबरच मार्गदर्शक प्रणाली बँकांच्या परिषदा, गव्हर्नर, डेप्युटी गव्हर्नर यांची भाषणे यांसारख्या बाबींद्वारे देखील रिझर्व्ह बँक बँकांचे नियमन करीत असते.

रिझर्व्ह बँक पुढीलप्रमाणे बँकांचे नियमन करते.

1. बँकींग विषयक परवाना बँकांना उपलब्ध करण्याचा रिझर्व्ह बँकेला अधिकार आहे. रिझर्व्ह बँकेने त्यासंदर्भात सार्वत्रिक बँक परवाना धोरण फरकावर आधारीत बँकीग परवाना धोरण निश्चित केले आहे.
फरकावर आधारित परवाना धोरणानुसार पेमेंट बँका आणि लघु वित्त बँका यांना परवाना देण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. फरकावर आधारित परवाना धोरणाचा उद्देश वित्तीय समावेशकतेला चालना देणे आहे.

२. भारतामध्ये बँकांना शाखा उभारण्यास मान्यता देण्याचा अधिकारदेखील रिझर्व्ह बँकेला आहे.

३. परकीय बँकांना भारतामध्ये प्रवेश देण्यासंदर्भात रिझर्व्ह बँकेवर जबाबदारी असून त्यांचे नियमनदेखील रिझर्व्ह बँकेद्वारे करण्यात येते.

४. भारतीय बँकांना परदेशामध्ये शाखा उघडण्यासाठी रिझर्व्ह बँकेद्वारे मान्यता घेणे आवश्यक आहे.

५. बँकीग नियंत्रण कायदा – १९४९ कलम ३५ नुसार बँकाची तपासणी रिझर्व्ह बँक करु शकते.

६. बँकाचे विलिनीकरण, पुनर्रचना आणि बँकांची दिवाळखोरी या बाबी रिझर्व्ह बँकेच्या देखरेखीखाली केल्या जातात.

७. वसूल न झालेल्या कर्जाचे प्रभावी व्यवस्थापन यासाठी रिझर्व्ह बँकेने बँकांना वेळोवेळी मार्गदर्शन प्रणाली प्रसारीत केली आहे.
भारतीय बँकीग व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आणि बँकीग व्यवसायास प्रोत्साहन देण्याचे कार्य रिझर्व्ह बँकेद्वारे करण्यात येते.

अनुत्पादक कर्जे (NPA)

पूर्व निर्धारित कालमर्यादेपासून 90 दिवसांपर्यंत वसूल न झालेल्या कर्जाचा समावेश अनुत्पादक कर्जामध्ये करण्यात येतो. अनुत्पादक कर्ज प्रमाणावर बँकांची आर्थिक स्थिती मोठया प्रमाणात अवलंबून असते.

अनुत्पादक कर्जाचे प्रमाण वाढल्यास, बँकांतील ठेवींची सुरक्षितता कमी होते तर अनुत्पादक कर्ज प्रमाण (NPA प्रमाण) कमी असल्यास ठेवीची सुरक्षितता वाढते.

भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR)

CRAR = Capital to Risk weighted Assets Ratio - CAR = Capital Adequancy Ratio

बँकाचे भांडवल व बँकांनी दिलेली कर्जे यांच्या प्रमाणास (CRAR) किंवा (CAR) (भांडवल पर्याप्तता प्रमाण) असे म्हणतात.

बँकांचे पुरेसे भांडवल असेल तर बँकांची तरलता पेचप्रसंगाला सामोरे जाण्याची क्षमता अधिक असते. त्यामुळेच बँकांचे पुनर्भांडवलीकरण केल्यास बँकांची आर्थिक सक्षमता वाढते.

CRAR जास्त असेल तर ठेवीदारांच्या ठेवींची सुरक्षितता जास्त असते आणि CRAR कमी झाल्यास ठेवीदारांच्या ठेवींची सुरक्षितता
कमी होते.

$$\text{CRAR} = \frac{\text{भांडवल}}{\text{जोखीमयुक्त कर्जे}}$$

$$\text{CRAR} = \frac{\text{Capital}}{\text{Risk Weighted Assets}}$$

Tier I - भांडवल :

यामध्ये अशा वित्तीय भांडवलाचा समावेश होतो की, जे जास्त तरल व विश्वासार्ह आहे. यामध्ये वसूल भांडवल बँकांचा वैधानिक राखीव निधी, मुक्त राखीव निधी व राखीव भांडवलाचा समावेश होतो. या भांडवलाला गाभा भांडवल म्हटले जाते. हे भांडवल अत्यंत महत्वाचे आहे. कारण हे बँकेला सुरक्षितता व वित्तीय व्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करुन देते. बँकेला आपला व्यवसाय बंद न करता अनपेक्षित तोटा भरुन काढण्यासाठी हे भांडवल तात्काळ उपयोगी पडते.

Tier - II भांडवल :

यामध्ये स्थायी अग्रहक्क भागांचे वसूल भांडवल, मालमत्तेचे पुनर्मूल्यांकन, भांडवली गुंतवणूक इत्यादी हे भांडवल ठेवीदारांना फारशी सुरक्षा देत नाही, परंतु बँकांचा तोटा भरुन काढते. एखाद्या बँकेने व्यवसाय बंद करावयाचा ठरवला तर त्यावेळी बँकांचा तोटा हे भांडवल भरुन काढू शकते.

या ठिकाणी महत्वाची बाब म्हणजे किमान भांडवल पर्याप्तता निकष गाठण्यासाठी Tier II भांडवल हे Tier I भांडवलाच्या 50% पेक्षा जासत असता कामा नये.

$$\text{भांडवल पर्यापत दर} = \frac{\text{भांडवल}}{\text{जोखीम भारांकित मालमत्ता}}$$

बेसल निकष

- आंतरराष्ट्रीय वित्तीय स्थिरता व सहकार्य प्राप्त करण्यासाठी व जगातील बँकांसाठी सुरक्षित वित्तीय सुरक्षा जाळे निर्माण करण्यासाठी बेसल निकष तयार करण्यात आले आहेत.
- BIS - (Bank for International Settlement) या स्वित्झर्लंडमध्ये स्थित असलेल्या बँकेने बेसल निकष तयार केले आहेत.
- BIS बँक जगातील सर्व मध्यवर्ती बँकांची बँक म्हणुन ओळखली जाते.
- **बेसल बँकेची स्थापना - 17 मे 1930 मुख्यालय बेसल शहर स्वीत्झरलँड**
  भारताचे प्रतिनिधीत्व 9 सप्टेंबर 1996
- बेसल निकष ठरविण्यासाठी व त्यांची अंमलबजावणी करण्याचे काम BCBS (Basel Committee on Bank supervision) ही समिती करते.
- G-20 देश समितीचे नेतृत्व करतात.

बेसल निकष

बेसल - I

1988

- पतजोखीम वर सर्वाधिक भर
- जोखीम वर्गीकरण
- 0%, 10%, 20%, 50%, 100%
- CRAR - 8% गाठण्याचे लक्ष
- Tier-I किमान - 4%
- 1992 पर्यंत गाठण्याचे लक्ष
- जागतिक बँकिंग क्षेत्रात समान मानक

बेसल - II

2004

- MCR ची सुस्पष्ट व्याख्या
- CRAR चे 4% लक्ष गाठले
- पतजोखीम न मोजता बाजार जोखीम मोजावी
- बाहय निरिक्षणास महत्व
- बाजार शिस्त

बेसल - III

2010

- डिसेंबर 2010

तीन स्तंभ

पतजोखीम | बाजार जोखीम | कार्यात्मक जोखीम

- तरलता जोखीम व प्रतिमान जोखीम स्विकारण्यात आले.
- 2013 ला लागू करणे व 2015 पर्यंत गाठणे
- BCBS ने कालमर्यादा वाढली 31 मार्च 2018 ते 31 मार्च 2019

वित्तीय क्षेत्रातील सुधारणा

- 1991 च्या नवीन आर्थिक धोरणमुळे नवीन रचनात्मक समायोजन आणि स्थिरीकरण कार्यक्रमांना सुरुवात झाली.
- भारतीय वित्तीय क्षेत्रात मोठे बदल घडून आले.
- नवीन आर्थिक धोरणाची सुरवात झाल्यावर वित्तीय बाबींशी संबंधीत गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी एम.नरसिंहम समितीची स्थापना केली.
- नरसिंहम समिती दोन वेळा स्थापन करण्यात आली. 1991 मध्ये पहिली तर 1997 मध्ये दुसरी समिती स्थापन करण्यात आली.
- **समितीचा मुख्य भर -**

बँकाजवळचा निधी हा सर्वसामान्य जनतेकडून येतो. त्यामुळे या निधीचा वापर अशा पध्दतीने झाला पाहिजे की ठेवीदारांना जास्तीत जास्त लाभ मिळू शकेल.

एम.नरसिंहम समिती - 1991

समितीचे नाव - वित्तीय क्षेत्र सुधारणा समिती
समितीची स्थापना - 14 ऑगस्ट 1991 अहवाल 8 नोव्हेंबर 1991
शिफारशी -

1. बँकांना कार्यात्मक स्वायत्ता व लवचिकता प्रदान करणे
2. वैधानिक तरलता प्रमाण SLR -38.5% वरुन 5 वर्षाच्या काळात 25% पर्यंत कमी करणे
3. रोख राखीव प्रमाण (C.R.R.) 15% वरुन 3 ते 5 % पर्यंत कमी करणे -(मूलभूत CRR 3% पेक्षा जास्त असावा)
4. CRR व SLR निधी यावर बँकांना दिल्या जाणाऱ्या व्याजात वाढ करावी.
5. प्राधान्य क्षेत्रास दिल्या जाणाऱ्या 40% मर्यादा वरुन 30% पर्यंत कर्ज मर्यादा आणणे 10% ने कमी करणे
6. व्याजावरील नियंत्रणे दुर करणे
7. भांडवलाचा तुटवडा दूर करणे
8. बँकाच्या मालमत्तेचे मूल्यांकन विश्वासार्ह मूल्याने करावे.



9. NPA च्या सुरुवात ताळेबंद दाखवू नये.
10. 180 दिवसापेक्षा जास्त काळ थकीत असेल तर ती मालमत्ता (NPA) समजली जावी.
11. परकीय बँकांना परवाने देणे
12. खाजगी क्षेत्रात नवीन बँका स्थापन करण्याचे परवाने देणे
13. ARF - (Asset reconstruction fund) ची स्थापना करावी
14. बँकावर RBI चे नियंत्रण असणे
15. विशेष (लवाद) न्यायालयाची स्थापना करणे
16. ग्रामीण कर्जाची रचना करणे

एम.नरसिंहम समिती-II - 1997

समितीचे नांव - बँकिंग क्षेत्र सुधारणा समिती

स्थापना - 1997

अहवाल - 23 एप्रिल 1998

1. **बँकींग व्यवस्थेची त्रिस्तरीय रचना करणे**
   - **आंतरराष्ट्रीय बँका** - 2 ते 3
   - **राष्ट्रीय बँका** - 8 ते 10
   - **प्रादेशिक बँका** - लहान बँका
2. दुर्बल बँकांच्या समस्या स्वातंत्र्यपणे हाताळण्यात याव्यात.
3. NPA चे प्रमाण करण्यासाठी त्वरीत उपाय योजना कराव्यात.
4. विकास वित्तीय संस्था (DFIS) चे एकत्रिकरण करावे.
5. बँकांच्या कार्यप्रणाली बाबत लवचिकता प्रदान करणे
6. बेसल निकष कृतीत आणावेत.
7. आजारी उद्योगांचा आढावा घेणे आवश्यक आहे.
8. बँकांची अंगभूत ताकद वाढविणे.

व्यापारी बँका

❍ व्यापारी बँकेचे कार्ये ❍

प्राथमिक कार्ये

I) ठेवी स्विकारणे :-

A) मागणी ठेवी

i) चालू ठेवी / Current Account

ii) बचती ठेवी / Saving Account

B) मुदती ठेवी

i) पुनरावर्ती ठेवी (Recuring Deposit)

ii) मुदतबंद ठेवी (FD) Fixed Deposit

II) कर्ज देणे :-

A) मुदत कर्ज (Term-loan)

- अल्पकाळ - 1 वर्षापर्यंत कर्ज
- मध्यमकाळ - 1-3 वर्षापर्यंत कर्ज
- दीर्घ कर्ज - 3-5 वर्षापर्यंत कर्ज

B) अधिकर्ष सवलत (Overdraft facility)

- 90 दिवसाच्या ठेवीपेक्षा जास्त कर्ज - ठेवी पेक्षा जास्त प्रमाणात दिली जाणारे कर्ज

C) रोख स्वरुपातील कर्ज

- तारणावरील कर्ज - कर्ज खात्यात जमा रक्कम - चेकचा वापर इत्यादी.

D) पैसे देण्याची हमी

- हमी शुल्क - दुसऱ्याचे कर्ज वसुल केले जाते.

दुय्यद कार्ये

A) प्रतिनिधीक कार्ये :-

i) धनादेशाची वसूली

ii) हुंडी व वचनचिठ्ठी

iii) स्थायी सुचनाचे पालन

iv) विश्वस्त / व्यवस्थापन

B) सर्वसामान्य कार्ये

i) सुरक्षित ताबा

ii) लॉकरचा वापर. कार्यपद्धत - पावती, स्टॅम्प माहिती.

C) सुरक्षित ठेवगृह

- सुरक्षित कपात ठेवी
- वस्तू ठेवणे व कर.

अनुसूचित व बिगर अनुसूचित बँका

A) अनुसूचित बँका :-

† £ö "ज्या बँकांचा RBI कायदा 1934 च्या दुसऱ्या अनुसूचितमध्ये करण्यात आला आहे. त्यांना अनुसूचित बँका असे म्हणतात."

निकष :-

1. अशा बँकांचे एकुण भाग-भांडवल व राखीव निधी 5 लाख रुपयांपेक्षा कमी नसावे.
2. 1934 RBI Act या कायद्याच्या दुसऱ्या सुचिमध्ये नावा असावे.
3. भारतीय शेअर बाजारात त्या बँकेचे नाव असावे.
4. मध्यवर्ती बँकेने त्या बँकेला अनुसूचित बँकांचा दर्जा दिलेला असावा.

सुविधा :-

1. अशा बँकांना RBI सुरक्षितता देते व पतमूल्यप्राप्त होते.
2. RBI कडून बँक दराने कर्जे मिळवणारा पात्र.
3. पुर्नविताची सोयी व इतर वित्तीय सुविधा.

समाविष्ट बँका :-

1. SBI व SBI group - 5
2. राष्ट्रीयकृत बँका
3. प्रादेशिक ग्रामिण बँका
4. परकीय बँका
5. भारतीय खाजगी बँका
6. राज्य सहकारी बँका

B) बिगर अनुसूचित बँका :-

अर्थ - RBI च्या 1934 कायद्याच्या दुसऱ्या सुचित करण्यात आलेला नाही अशा बँका.

- या बँकांना वरील सुविधा प्राप्त होत नाहीत.
- RBI चे बंधने लागू होत नाहीत पण काही बंधने लागू होतात.
  उदा. CRR, SLR, etc.

समाविष्ट बँका :-

1. भारतीय खाजगी गैर अनुसूचित बँका.
2. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका.
3. प्राथमिक सहकारी पतसंस्था.

बिगर अनुसूचित बँकांना आरबीआयच्या इतर सुविधा प्राप्त होत नाहीत.



भांडवली बाजार

भांडवली बाजार

- **1. गिल्ट बाजार** → शासकीय प्रतिभूती बाजार
- **2. औद्योगिक रोखे बाजार**
  - नवरोखे बाजार → प्राथमिक बाजार
  - विद्यमान रोखे बाजार → दुय्यम बाजार (शेअर बाजार)
- **3. विकास संस्था**
- **4. मध्यम विकास संस्था**

1. अखिल भारतीय → IFCI, ICICI, IDBI, IIBI
2. गुंतवणूक संस्था → LIC, GIC, UTI
3. राज्यस्तरीय → SFCS, SIDBIS, SSIDBIS
4. इतर उच्च संस्था → NABARD, EXIM BANK, NHB

IFCI - Industrial Financial Corporation of India

(भारतीय औद्योगिक वित्तीय महामंडळ)

- **स्थापना -** 1 जुलै, 1948
- **मुख्यालय -** नवी दिल्ली.
- IFCI ची स्थापना केंद्रिय बॅकिंग चौकशी समितीच्या शिफारशीवरुन करण्यात आलेली आहे.
- **उद्देश :-**
  1. देशातील उद्योगांना मध्यम व दीर्घकालीन कर्ज पुरवणे.
  2. सार्वजनिक व खाजगी उद्योगांना कर्जे पुरवठा करणे.
- **कार्ये :-** मोठ्या व मध्यम उद्योगांना वित्तीय व बिगर वित्तीय साहाय्य.

वित्तीय मदत :-

a) 1 कोटी रुपयापर्यंतची व 25 वर्षापर्यंत कर्जे.

b) परकीय चलनातील कर्जे.

c) कर्जाला हमी देणे.

d) उद्योग, संस्थांना भाग विमेकरी सेवा पुरवणे.

e) इतर तांत्रिक, व्यवस्थापकीय, प्रशासकीय मार्गदर्शन.

- 1 जुलै 1993 रोजी IFCI चे 1956 च्या कंपनी कायद्याप्रमाणे सार्वजनिक मर्यादित कंपनीत रुपांतर करण्यात आले आहे.

ICICI - Industrial Credit and Investment Corporation

- भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळ ICICI ही एक वैश्विक बँक आहे. Universal Bank.
- स्थापना :- ICICI ची स्थापना 5 जानेवारी, 1955 मध्ये करण्यात आली.
- प्रत्यक्षात कार्य - 14 एप्रिल, 1955.
- 1994 मध्ये ICICI Limited सुरु करण्यात आली.
- 3 मार्च, 2002 ICICI Limited चे ICICI Bank मध्ये विलीनीकरण करण्यात आले.
- **मुख्यालय :-** मुंबई (सुरुवातीला मुख्यालय - बडोदा)
- ICICI च्या स्थापनेसाठी 1949 च्या कंपनी कायद्याचा आधार घेण्यात आला.
- ICICI खाजगी क्षेत्रामधील भारतातील सर्वात मोठी बँक आहे.
- भारतात ATM ची सुविधा देणारी ICICI पहिली बँक होय.
- सन 2000 साली NYSE (Newyork Stock Exchange) मध्ये सुचीकृत होणारी पहिली भारतीय बँक होय.
- यानुसार अमेरिकेचा शेअर बाजारात या वेळेचे नाव समाविष्ट करण्यात आले.
- ICICI चा सार्वजनिक कार्यक्रमात सहभाग :-
  1. शैक्षणिक उपक्रम - Read to Lead
  2. पर्यावरण - Go green initative

ICICI Bank

कार्ये :-

- खाजगी मध्यम व लघू उद्योगांना कर्ज.

- परकीय चलनात कर्ज.

- सर्वच क्षेत्रांना कर्ज (खाजगी, सार्वजनिक व संयुक्त क्षेत्र)

IDBI - Industrial Development Bank of India (भारतीय औद्योगिक विकास बँक) (Universal Bank)

- **स्थापना -** IDBI कायदा 1964 नुसार जुलै 1964 मध्ये IDBI ची स्थापना करण्यात आली.
- **मुख्यालय -** मुंबई.
- **उल्लेख -** 'नव्या युगातील सार्वजनिक बँक' म्हणून ओळखली जाते.
  - देशात चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी सार्वजनिक बँक.
  - विकास बँक म्हणुन जगात 10 व्या स्थानी आहे.
- सुरुवातीस IDBI ही RBI च्या मालकीची बँक होती.
- IDBI मध्ये शासनाचे एकुण 65.17% शेअर्स आहेत. त्यामुळे 16 फेब्रुवारी, 1976 पासून IDBI शासनाची बँक आहे.
- IDBI चे एकुण शाख 923.
  एकुण विकास केंद्रे - 621 त्यापैकी (1 सिंगापूर, 1 बिजींग)
  एकुण ATM - 1514
- 1 ऑक्टोबर, 2004 मध्ये बँकिंग कंपनी म्हणून व्यवहार.
- 11 ऑक्टोबर, 2004 मध्ये IDBI ला अनुसूचित बँकेचा दर्जा.
- 28 वी सार्वजनिक बँक होय. (RRB वगळता)
- **कार्ये :-**
  1. औद्योगिक विकास बँक
  2. सार्वजनिक प्रकल्पांना वित्त पुरवठा.
  3. भाग विमेकरी सेवा पुरवते.
  4. कर्ज हमी सेवा, मर्चंट बँकींग व इतर कार्ये.

IDBI BANK

- स्लोगन :- 'बँक ऐसा दोस्त जैसा, Banking for All, आओ सोचे बडा'
- 1971 मध्ये भारतातील आजारी उद्योगांना पुनर्वसनासाठी IRCI ची स्थापना करण्यता आली.
- IRCI - Industrial Reconstruction Corportion of India - औद्योगिक पुनर्वनिर्माण महामंडळ.
- 1975 मध्ये IRCI चे IRBI मध्ये रुपांतर.
- 1984 IRBI कायदा संमत.
- 27 मार्च 1997 पासुन IRBI चे IIBI मध्ये रुपांतर.
- सार्वजनिक क्षेत्रातील विकास बँक.

SBI - State Bank of India (भारतीय स्टेट बँक)

- **स्थापना -** 1 जुलै, 1955
- **पार्श्वभूमी -**

1806-09	बँक ऑफ बेंगाल	- प्रेसिडेन्सी बँक
1840	बँक ऑफ बॉम्बे	- प्रेसिडेन्सी बँक
1843	बँक ऑफ मद्रास	- प्रेसिडेन्सी बँक

- वरिल तिन्ही प्रेसिडेन्सी बँकांचे रुपांतर 1921 मध्ये इम्पिरिअल (Imperial Bank) करण्यात आले.
- 1954 मध्ये 'ग्रामीण पतपुरवठा सर्व्हेक्षण समितीची' स्थापना या समितीचे अध्यक्ष ए.डी. गोरवाला होते.
- या समितीच्या शिफारशीवरुन 1 जुलै, 1955 ला इंपेरिअल बँकेचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. तीचे नाव 'स्टेट बँक ऑफ इंडिया' असे ठेवण्यात आले.
- 1955 मध्ये SBI कायदा संमत करण्यात आला.
- SBI एकुण भांडवलापैकी 1955 मध्ये 60% शेअर RBI बँकेने घेतले.
- 2008 पर्यंत 92% वाटा झाला व 2008 मध्ये हा वाटा केंद्र सरकारकडे देण्यात आला.
- म्हणुन SBI पुर्ण सार्वजनिक बँक असुन ती राष्ट्रीयकृत बँक नाही.
  मुख्यालय - मुंबई.
  भाग भांडवल - अधिकृत भांडवल 200 कोटीचे होते नंतर 1000 कोटी पर्यंत वाढले.
  व्यवस्थापन - 21 सदस्याचे संचालक मंडळ.
  त्यापैकी 1 अध्यक्ष व 2 व्यवस्थापकीय सदस्य असतो.
  सध्या SBI च्या अध्यक्ष :- श्रीमती अरुंधती भट्टाचार्य.
  - कार्यकाल चार वर्ष

6 संचालक - भागधारकाकडून नियुक्त. 8 संचालक - केंद्र सरकार निवडते. 1 संचालक - RBI

15 जुन, 2015 केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी सहयोगी शाखांचे SBI मध्ये विलनीकरण त्यानुसार :-
SBI जगातील 50 वी बँक. भारतात 20% कर्जवाटा. शाखा - 22,500. ATM - 58,000. 198 विकास केंद्र.
महिला बँक नोव्हेंबर, 2013 स्थापन केली.

- 2015 नुसार फोर्ब्सच्या मते जगात 29 क्रमांकाची मोठी बँक आहे.

SBI च्या सहयोगी शाखा -

i) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद

ii) स्टेट बँक ऑफ पटियाला

iii) स्टेट बँक ऑफ त्रावणकोर

iv) स्टेट बँक ऑफ म्हैसूर

v) स्टेट बँक ऑफ बिकानेर व जयपुर.

- 1959 मध्ये SBI सलग्न बँक कायदा करण्यात आला.
- सुरुवातीस 8 सलग्न बँका होत्या त्यापैकी
  26 ऑगस्ट, 2010 मध्ये स्टेट बँक ऑफ इंदुरचे SBI मध्ये विलीनीकरण.
  1 जानेवारी, 1997 काशिनाथ सेठ बँकेचे SBI मध्ये विलीनीकरण.
- **उद्दिष्ट्ये :-**

1. ग्रामिण भागात SBI चा शाखा विस्तार करणे.
2. कृषी कर्जपुरवठा करणे.

3. व्यापारी बँकामधील बहुतांश भाग सार्वजनिक क्षेत्रात आसणे.

4. लघू उद्योगांना कर्जे.

5. आर्थिक विकास.

कार्ये :-

कर्जे देणे, तारणावर कर्ज, हुंडी काढणे, स्वीकारणे, विकणे, वटवणे. गुंतवणूक करणे, विश्वस्थ म्हणुन काम पाहणे, आंतरराष्ट्रीय हुंड्या वाटवणे.

- SBI भारतातील सर्वात मोठी सार्वजनिक बँक.

शाखा विस्तार वर्ष	शाखा
जुलै 1955	400
1964	300 नवीन शाखा (700)
1969	1569
1973	2867 (परदेशात - 157 शाखा)
1990	8,216 (एकुण ATM 45,000 SBI group)
2012	15,003
2014	21,500 (SBI च्या विलनीकरणानंतर एकुण शाखा 22,500 आहेत.)

NABARD - National Bank for Agriculture and Rural Deveopment

- **स्थापना -** 12 जुलै, 1982
- कृषी पतपुरवठ्यातील शिखर बँक (Apex Bank)
- NABARD स्थापनेपूर्वी कृषी वित्तपुरवठा RBI कडे होता.
- RBI चे दोन विभाग कृषी वित्त पुरवठा करत.
  त्यापैकी 1) ग्रामिण पत विभाग, 2) ग्रामिण नियोजन
  1) 1963 मध्ये कृषी पुनर्वित महामंडळ स्थापन (ARC)
     ARC - Agriculture Refinance Corportion
  2) 1973 - कृषी पुनर्वित विकास महामंडळ (ARDC)
     ARDC - Agriculture Refiance Development Corporation.
- 1979 - श्री. बी. शिवरामन यांच्या अध्यक्षतेखाली कृषी व ग्रामिण विकास समिती.
- 1982 - मध्ये NABARD Act संमत करण्यात आला. या कायद्यानुसार 12 जुलै, 1982 NABARD ची स्थापना.
- मुख्यालय - मुंबई.
- भागभांडवल - अधिकृत 500 कोटी भागभांडवल. 100 कोटी.
  NABARD सुधारणा कायदा 200 नुसार एकुण भांडवल 2000 कोटी करण्यात आले.
  RBI चा 71.5% वाटा शासनाकडे (1430 कोटी रुपये)

- सध्या RBI चा NABARD मधील वाटा 1% आहे.

- **कार्ये :-**

शिखर बँक व पुनर्वित पुरविणे असे दुहेरी कार्य करते.(Dual Role)

पुनर्वित - शेती, लघुउद्योग, कुटीरोद्योग, इत्यादी.

राज्य सहकारी, RRB भु-विकास बँकांना साह्य.

1) दीर्घकालीन कर्जे - 25 वर्षे

2) अल्पकालीन 18 महिने

3) मध्यम कर्ज - 18 महिने ते 7 वर्ष

- सुक्ष्म पतपुरवठा करणारी सर्वात मोठी संस्था (Micro Finance)

- बचत गट (Self Help Group) SHG ला मदत.

RRB - Regioanl Rural Bank

(क्षेत्रीय ग्रामिण बँक)

- **स्थापना :** 2 ऑक्टोबर, 1975

- 2005 पर्यंत 195 RRBs, 2011 पर्यंत 82 RRBs.

- 23 सप्टेंबर, 1975 - ग्रामिण क्षेत्रिय बँक स्थापनेचा शासकीय निर्णय.

- **उद्देश :**

1. दुरच्या ग्रामिण भागात बँकिग सुविधा देणे,
2. कमी उत्पन्न गटातील लोकांना कर्ज पुरवठा.

कृषी पतपुरवठा क्षेत्रात घडून आलेल्या पुढील घडामोडी.

- कृषी व ग्रामिण क्षेत्राला कर्ज पुरवठा.

- RRB कायदा 1976.

रचना :-

1. RRB चे कार्यक्षेत्र 1 जिल्हा व काही जिल्ह्यापर्यंत सिमीत आहे.
2. **RRB मध्ये 50% वाटा भारत सरकार, 15% राज्य सरकारचा तर 35% भागभांडवलातून जमा केला जातो.**
3. अनुसूचित बँका RRB च्या पुरस्कृत बँका आहेत.
4. लघू व सिमांत शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करते.

5. 1987 च्या कायद्यानुसार 5 कोटी तर वसुल भांडवल 1 कोटी होते.

6. RRB ला कर्ज व पुर्नवित्त सुविधा NABARD कडून पुरविली जाते.

7. RRB **"लहान व्यक्तीची बँक"** म्हणून ओळखली जाते.

शाखा विस्तार :-

प्रादेशिक ग्रामिण बँक	**राज्य**	**पुरस्कृत बँक**
मोरादाबाद	उत्तरप्रदेश	सिंडीकेट बँक
गोरखपूर	उत्तरप्रदेश	स्टेट बँक
भिवंडी	हरयाणा	पंजाब नॅशनल बँक
जयपुर	राजस्थान	युको बँक
माल्डा	पश्चिम बंगाल	युनायटेड बँक ऑफ इंडिया

कार्य :-

1. कर्ज, छोटे, सिमांत शेतकरी.
2. भूमिहीन, कृषी कामगार.
3. लघू उद्योजक, ग्रामिण कारागिर इत्यादींना कर्ज.
4. ग्रामिण लोकांत बचतीची सवय.
5. उद्योजकतेचा विकास.
6. सावकाराच्या तावडीतून सोडवणे.

- डिसेंबर, 2015 पर्यंत RRB च्या एकुण 56 शाखा आहेत.

महाराष्ट्रात 3 RRB आहेत :-

1. महाराष्ट्र ग्रामिण बँक - नांदेड - 16 जिल्ह्यांत आहे.
2. विदर्भ क्षेत्रिय ग्रामिण बँक - अकोला - 5 जिल्ह्यांत आहे.
3. वेनगंगा कृष्णा ग्रामिण बँक - सोलापूर - 12 जिल्ह्यांत आहे.

Exim Bank

- **1981 च्या कायद्यानुसार Exim बँकेची स्थापना.**
- **स्थापना :** 1 जानेवारी, 1982
- आंतरराष्ट्रीय वित्त पुरवठ्यासाठी शिखर बँक.
- आयात-निर्यातीसाठी पुरवठा करणारी अग्रणी बँक.
- वित्तीय मदत - हुंड्या स्विकारणे, पुर्नवित्त पुरवठा करणे, हुंड्यांची पुनर्वटवणूक करणे.

LIC - मुंबई

- **स्थापना -** 1 सप्टेंबर, 1956
- सर्वात मोठी शासकीय मालकीची शासकीय खर्चात 24.6% निधी.
- LIC विमेकरी म्हणून ओळखली जाते.
- दोन प्रकारच्या विमा काढल्या जातात -
  1. जीवन विमा (Life Insurance),
  2. साधारण विमा (General Insurance).
- LIC चे 8 झोन कार्यालय आहेत. 113 डिव्हिजनल ऑफिस आहेत.
- 243 जीवन विमा पुरविणाऱ्या खाजगी संस्थांचे मिळून LIC ची स्थापना केली आहे.
- 2006-07 मध्ये एकुण भारताच्या GDP मध्ये LIC चा वाटा 7% होता.

GIC - General Insurance Corporation of India

- 1850 मध्ये कोलकाता येथे स्थापन झालेली ट्रिटॉन इन्शुरन्स कंपनी ही भारतातील साधारण विमा व्यवसाय सुरु करणारी पहिली कंपनी. 1957 मध्ये साधारण विम्याची कायदेशीर चौकट पुरविण्याच्या उद्देशाने साधारण विमा परिषद (General Insurance Council) स्थापन करण्यात आली.

- 1972 मध्ये साधारण विमा पुरविणाऱ्या 50 भारतीय आणि 52 परकीय कंपन्यांचे साधारण विमा व्यवसाय (राष्ट्रीयीकरण) कायदा (Generl Insurance Business (Nationalisation) Act) नुसार राष्ट्रीयीकरण करण्यात आले व 22 नोव्हेंबर, 1972 ला या कंपन्यांच्या एकत्रीकरणातून GIC ची स्थापना करण्यात आली.

- GIC ने पुढे 4 उपकंपन्या स्थापल्या. या उपकंपन्या आणि त्यांची मुख्यालये -
  - i) National Insurance Company Ltd. - कोलकाता
  - ii) New India Assurance Company Ltd. - मुंबई
  - iii) Oriental Insruance Company Ltd. - नवी दिल्ली
  - iv) United India Insruance Company Ltd. - चेन्नई.

UTI - Unit Trust Of India

- UTI कायदा - 1963 नुसार फेब्रुवारी, 1964 मध्ये भारतात UTI ची स्थापना करण्यात आली.

- ही गुंतवणूक संस्था आहे. 1 जुलै, 1964 पासून UTI ची प्रत्यक्षात कार्यालय सुरुवात.

- मध्यम व कमी उत्पन्न गटांच्या बचतीस प्रोत्साहन देणे, त्या गोळा करणे, यांची भांडवली बाजारात गुंतवणूक करुन दोहोंना (गुंतवणूकदारांना आणि उद्योगांना) औद्योगिक विकासाच्या फायद्यातील वाटा मिळावा हा UTI चा प्राथमिक उद्देश होता. त्यासाठी **'US-64'** या नावाने म्युच्युअल फंड तयार केला.

17. कॅनरा स्टॉक एक्स्चेंज, मंगलोर
18. लुधियाना स्टॉक एक्स्चेंज, लुधियाना
19. चेन्नई स्टॉक एक्स्चेंज, चेन्नई
20. एम.पी. स्टॉक एक्स्चेंज, इंदूर
21. मगध स्टॉक एक्स्चेंज, पाटणा
22. पुणे स्टॉक एक्स्चेंज, पुणे
23. कॅपिटल स्टॉक एक्स्चेंज केरळ लि., तिरुअनंतपुरम

(2007 मध्ये सेबीने सौराष्ट्र स्टॉक एक्स्चेंज, राजकोटची परवानगी काढून घेतली होती. त्यामुळे सध्या 23 शेअर बाजार देशात कार्यरत आहेत.)

शेअर बाजार

☛ **मुंबई शेअर बाजार - BSE - Bombay Stock Exchange**

स्थान - मुंबई-दलाल स्ट्रीट

स्थापना - 1877 (आशियातील सर्वांत जुना बाजार)

सूचीकृत कंपन्या - 5459

☛ **राष्ट्रीय शेअर बाजार - NSE - National Stock Exchange**

स्थान - मुंबई

स्थापना - 1992

सूचीकृत कंपन्या - 1696

☛ **भारतात सध्या खालील 23 शेअर बाजार कार्यरत आहेत.**

1. यू.पी. स्टॉक एक्स्चेंज, कानपूर
2. वडोदरा स्टॉक एक्स्चेंज, वडोदरा
3. कोईमतूर स्टॉक एक्स्चेंज, कोईमतूर
4. मीरत स्टॉक एक्स्चेंज, मीरत
5. मुंबई स्टॉक एक्स्चेंज (BSE), मुंबई
6. ओव्हर द काऊंटर एक्स्चेंज ऑफ इंडिया, मुंबई
7. नॅशनल स्टॉक एक्स्चेंज (NSE), मुंबई
8. अहमदाबाद स्टॉक एक्स्चेंज, अहमदाबाद
9. बेंगळुरु स्टॉक एक्स्चेंज, बेंगळुरु
10. भुवनेश्वर स्टॉक एक्स्चेंज, भुवनेश्वर
11. कोलकाता स्टॉक एक्स्चेंज, कोलकाता
12. कोचीन स्टॉक एक्स्चेंज, कोचीन
13. दिल्ली स्टॉक एक्स्चेंज, दिल्ली
14. गुवाहाटी स्टॉक एक्स्चेंज, गुवाहाटी
15. हैदराबाद स्टॉक एक्स्चेंज, हैदराबाद
16. जयपूर स्टॉक एक्स्चेंज, जयपूर